# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग – III (प्रशासन शाखा) तथा सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक व त्या संवर्गातील समकक्ष पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा, २०१८

## प्रचलित शैक्षणिक प्रश्न (पुस्तकांशिवाय)

**प्रश्नपत्रिका क्रमांक –१**

**वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी १४.००**

**दिनांक : १०–०२–२०१८** **गुण : १००**

---

**सूचना :** १) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**प्र.1** (अ) शिक्षण संचालक (निरंतर शिक्षण) या राज्यस्तरीय कार्यालयाची संरचना आराखड्यासह सादर करा व त्याची उद्दिष्ट्ये नमूद करा. **[20]**

(ब) गट शिक्षणाधिकारी यांची शैक्षणिक कर्तव्ये लिहा.

**प्र.2** (अ) शाळा व्यवस्थापन समिती रचना व कार्यपध्दती स्पष्ट करा. **[20]**

(ब) जवाहर बालभवन, मुंबई प्रशासकीय रचना व राबविले जाणारे विविध कार्यक्रम याबाबत माहिती द्या.

**प्र.3** टीपा लिहा : (कोणत्याही **चार**) **[20]**

(अ) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ
(ब) स्वयंअर्थ सहाय्यित शाळा
(क) व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था
(ड) शाळा सिध्दीतील क्षेत्रे व मानके
(इ) राजमाता जिजाऊ मोफत – सायकल वाटप योजना

**प्र.4** (अ) नाविन्यपूर्ण उपक्रमाअंतर्गत शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी शाळांची निवड करण्याचे निकष व निवड करण्याची जबाबदारी याबाबत सविस्तर स्पष्टीकरण द्या. **[20]**

(ब) जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्थेची रचना व कार्य लिहा.

**प्र.5** थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही **चार**) **[20]**

(अ) लोकसंख्या शिक्षणाची उद्दिष्ट्ये लिहा.

(ब) राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर या संस्थेची उद्दिष्ट्ये लिहून, संस्थेमार्फत राबविण्यात येणारे विविध उपक्रम लिहा.

(क) राष्ट्रीय भारतीय सैनिक महाविद्यालय, डेहराडून येथील सरकारी शिष्यवृत्ती विषयी माहिती लिहा.

(ड) शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद या संस्थेची उद्दिष्ट्ये लिहा.

(इ) ‘स्त्री’ शिक्षण कक्षाची स्थापना करण्याचा उद्देश स्पष्ट करुन उद्दिष्ट्ये लिहा.

– – – – –

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग – III (प्रशासन शाखा) तथा सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक व त्या संवर्गातील समकक्ष पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा, २०१८

# शिक्षण खात्याचे नियम (पुस्तकांशिवाय)

**प्रश्नपत्रिका क्रमांक –२**

**वेळ : दुपारी १५.०० ते १८.००**

**दिनांक : १०–०२–२०१८** **गुण : १००**

**सूचना :** प्रत्येक प्रश्नाला २० गुण. कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा.

**प्र.1** टीपा लिहा : (कोणत्याही **चार**) **[20]**

(१) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रचना व कार्य (DIET)

(२) शाळा समिती व समन्वय समिती

(३) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षा

(४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम–२००९ (RTE Act -2009) मधील तरतूदी

(५) सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन (CCE)

(६) विस्तार अधिकारी (शिक्षण) कर्तव्ये

(७) महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली –१९८१ अनुसारची शिस्त विषयक संहिता

(८) शाळेचे सत्र, सुट्ट्या, शाळेचे तास याबाबत माध्यमिक शाळा संहितेमधील तरतूदी लिहा.

**प्र.2** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद संरचना, उद्दिष्ट्ये व कार्य स्पष्ट करा. **[20]**

**प्र.3** माध्यमिक शाळा संहितेनुसार मुख्याध्यापक व शिक्षकाची कर्तव्ये लिहा. **[20]**

**प्र.4** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम–२०११ (RTE Rule -2011) नुसार शाळा व्यवस्थापन समितीची रचना व कार्ये लिहा. **[20]**

**प्र.5** मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ नुसार शिक्षण उप–निरीक्षक व सहाय्यक शिक्षण उप–निरीक्षक यांचे अधिकार व कर्तव्ये लिहा. **[20]**

**प्र.6** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम – २०१२ नुसार नवीन शाळा स्थापन करण्यासाठी कोणत्या अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक ते स्पष्ट करा. **[20]**

**प्र.7** महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ नुसार माध्यमिक शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना कोणकोणत्या प्रकारच्या रजेची तरतूद आहे ते स्पष्ट करा. **[20]**

–––––

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग – III (प्रशासन शाखा) तथा सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक व त्या संवर्गातील समकक्ष पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा, २०१८

## सेवा नियम (पुस्तकांसह)

**प्रश्नपत्रिका क्रमांक – ३**

**वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी १४.००**

**दिनांक : ११–०२–२०१८** **गुण : १००**

---

**सूचना :** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) प्रत्येक प्रश्नासाठी असलेले गुण प्रश्नासमोर उजव्या बाजूस कंसात दर्शविले आहेत.
३) आवश्यक त्या ठिकाणी नियमांचा उल्लेख करावा.

**प्र.1** फरक स्पष्ट करा. (कोणतेही **चार**) **[20]**
(अ) स्थायी पद व अस्थायी पद
(ब) सरासरी वेतन व कायम वेतन
(क) मानधन व फी
(ड) प्रशिक्षण काळातील भत्ता व स्वगृही जाण्याचा भत्ता
(इ) परावर्तीत रजा व असाधारण रजा

**प्र.2** टीपा लिहा. (कोणत्याही **चार**) **[20]**
(अ) अध्ययन रजा
(ब) कुटुंब
(क) शिकावू उमेदवार
(ड) विशेष वेतन
(इ) पदग्रहण अवधी

**प्र.3** खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही **चार**) **[20]**
(अ) निवृत्ती वेतनाचे प्रकार सांगा.
(ब) जबर स्वरुपाच्या शिक्षा सांगा.
(क) अनर्जित रजा म्हणजे काय? त्याच्या शर्ती काय आहेत?
(ड) जन्म तारखेची नोंद सेवा पुस्तकात करण्याची कार्यपद्धतीचे वर्णन करा.
(इ) संप, निदर्शने यात शासकीय कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला याबाबत तरतूदी सांगा.

**प्र.4** (अ) शासकीय महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजा मंजूर करणे विषयी कोणती कार्यपद्धती आहे? **[20]**

(ब) धारणाधिकार कोणत्या परिस्थितीत अबाधित राहतो. सविस्तर व नियमांच्या आधारे तरतूदीसह स्पष्ट करा.

**प्र.5** खालील नमूद घटनांवर नियमांच्या आधारे तुमचा स्वतःचा अभिप्राय द्या. **[20]**
(अ) शासकीय कर्मचाऱ्याने पहिली पत्नी हयात असतांना दुसरा विवाह केला.
(ब) शासकीय कर्मचाऱ्याने धार्मिक संघटनेच्या निदर्शने कार्यक्रमात सहभाग घेतला.
(क) शासकीय कर्मचाऱ्याने मादक पेयाचे सेवन करुन कार्यालयात आला.
(ड) वृत्तपत्रे किंवा आकाशवाणी किंवा दूरदर्शन यांच्याशी संपर्क ठेवतो.

-----

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग – ।।। (प्रशासन शाखा) तथा सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक व त्या संवर्गातील समकक्ष पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा, २०१८

## लेखा व आर्थिक पद्धती (पुस्तकांसह)

**प्रश्नपत्रिका क्रमांक –४**

**वेळ : दुपारी १५.०० ते १८.००**

**दिनांक : ११–०२–२०१८** **गुण : १००**

---

**सूचना :** १) एकूण ६ प्रश्नांपैकी कोणतेही ५ प्रश्न सोडवा.
२) सर्व प्रश्नांसाठी समान गुण आहेत.
३) उत्तरामध्ये नियम व त्याचा क्रमांक लिहीणे आवश्यक आहे.

**प्र.1** टीपा लिहा. **[20]**
(अ) लेख्यांचे पंचस्तरीय वर्गीकरण
(ब) रोजकिर्द व खतावणी
(क) लेखानुदान
(ड) लोकलेखा समितीचे कार्ये

**प्र.2** (अ) भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांची कर्तव्ये व अधिकार स्पष्ट करा. **[20]**
(ब) शासनाच्या लेख्यांच्या विभागांचे सविस्तर वर्णन करा.

**प्र.3** अनुदानाचे पुर्नविनियोजन म्हणजे काय? ते कसे व कोणाकडून केले जाते? पुर्नविनियोजनास आवश्यक त्या अटी कोणत्या? **[20]**

**प्र.4** मुख्य अर्थसंकल्पिय प्रकाशने कोणकोणती आहेत? थोडक्यात माहिती द्या. तसेच मुख्य अर्थसंकल्पिय प्रकाशनांबरोबर इतर काही अनुषंगिक प्रकाशनेही तयार केली जातात ते थोडक्यात स्पष्ट करा. **[20]**

**प्र.5** नियंत्रक अधिकाऱ्याच्या एकत्रित हिशोबाचा महालेखापालांच्या हिशोबाशी ताळमेळ जुळविण्याचे महत्व व कार्यपध्दती स्पष्ट करा. **[20]**

**प्र.6** पुढील तपशिलावरुन (१) निवृत्ती वेतन (२) सेवानिवृत्ती उपदान (३) कुटुंबनिवृत्ती वेतन (४) अंशराशीकरण एवढ्या रकमा निश्चित करा. **[20]**

१) वर्ग १ अधिकारी जन्मतारीख १७ एप्रिल १९५५ नियत वयमान निवृत्ती
२) नियुक्तीचा दिनांक – ०१–०८–१९७७
३) निवृत्तीच्या वेळी वेतनबँड रु. १५,६०० – ३९,१०० मध्ये अंतिम वेतन – रु. २६,१४० + ग्रेड पे ५,४००
४) वेतनवाढीची तारीख १ जुलै

-----